# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०२६/प्र.क्र.११/विवक्षित/आ-१ (उविअ) दिनांक :- १०/०२/२०२६

**प्रति,**

सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्यासाठी जाहिरात सुचना क्र.२ सन २०२५-२६ सोबत पाठविण्यात येत आहे. सदरची जाहिरात सर्वात जास्त खपाच्या राज्यस्तरीय प्रसिध्द होणाऱ्या एका दैनंदिन मराठी वर्तमानपत्र व एका इंग्रजी वर्तमानपत्रात ९.५ x ६.०० चौ.से.मी. आकारातच एकदाच प्रसिध्दी देणेविषयी विनंती आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्यालयाचे नांव | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, नवी मुंबई |
| २) | वृत्तपत्रात सविस्तर सूचना प्रसिध्द होण्याचा दिनांक | : | १२.०२.२०२५ |
| ३) | प्रसिध्दी कोणत्या स्तरावर आवश्यक आहे | : | राज्यस्तरीय |
| ४) | जाहिरातीचे देयक कोणाकडे पाठवावयाचे आहे | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई |

जाहिरातीचे देयक (जाहिरातीसह) जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आठ दिवसांत वर नमुद केलेल्या कार्यालयात पोहोचेल अशा प्रकारे आपल्या स्तरावरुन कळवावे.

सोबत :- जाहिरात सुचना

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत :- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

सोबत जोडलेली जाहिरात सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन या कार्यालयास उलट टपाली अवगत करावे.

सोबत :- जाहिरात सूचना व अर्जाचा विहीत नमुना
प्रत :- कार्यालयीन सूचना फलक.

म.जी.प्रा. नवी मुंबई
उप अभियंता
आय.टी. सेल
आवक क्र.
दिनांक:-

Recd 12/2/26

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**संक्षिप्त जाहिरात सुचना क्र. २ सन २०२५-२६**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सदस्य सचिव कार्यालय, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई व स्थावर मालमत्ता कक्ष-९, बेलापूर नवी मुंबई येथील कार्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांची विवक्षित कामासाठी १ वर्षाकरिता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल https://mjp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-

मुख्य प्रशासकीय अधिकारी

MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN

Short advertisement Notic No. 2 for 2025-26

Executive Engineer, Deputy Engineer, Junior/Sectional Engineer (Civil) retired from service of Maharashtra Jeevan Pradhikaran is to be appointed on contract basis for a period of one year in Member Secretary office, M.J.P.,Express Towers, Nariman Point, Mumbai and Dest-9, CBD Belapur, Navi Mumbai. All the details are available on website, https://mjp.maharashtra.gov.in

Sd/-

Chief Administrative Officer

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com


## सविस्तर सूचना क्र.२, सन २०२५-२६

मा.सदस्य सचिव, कार्यालय एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई व स्थावर मालमत्ता कक्ष-९, बेलापूर नवी मुंबई या कार्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांची सेवा करार पध्दतीने खालील विवक्षित कामे करण्यासाठी घेण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | विवक्षित कामाचा तपशिल | सेवानिवृत्त अधिकारी आवश्यक संवर्ग | आवश्यक पदे | विवक्षित नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | १)महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभागाकरिता अत्यंत आवश्यक असणाऱ्या मराठवाडा वॉटर ग्रीड योजना तयार करण्याचे काम मजीप्रामार्फत सुरु आहे. त्याअंतर्गत मे.मेकोरोट कंपनीने सादर केलेल्या प्राथमिक संकल्पन अहवालांचा (PDRs) अभ्यास करणे, क्षेत्रीय अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून सदर अहवालांची तांत्रिक व्यवहार्यता व प्रत्यक्ष उपयोगिता तपासणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याच्या अनुषंगाने सल्लागाराच्या निवडीकरीता निविदा कागदपत्रे तयार करणे/तपासणी करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याच्या प्रगतीचा पाठपुरावा करणे, प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरीता मजीप्रास्तरावर सविस्तर धोरणात्मक नियोजन करणे, निधी उभारणीच्या अनुषंगाने मजीप्रास सादर झालेल्या अहवालांची छाननी करणे, विविध जागतिक वित्तीय संस्थांसमवेत समन्वय ठेवणे इत्यादी कामे<br>२) तसेच जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर प्रकल्प" (MUWREP) या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता मजीप्रामार्फत योजनांची तपासणी करणे. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (एस-२३, ६७७००-२०८७००) | १ | १२ महिने |
| | | उप अभियंता (स्थापत्य) (एस-२०, ५६१००-१७७५००) | १ | |
| | | कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) (एस-१४, ३८६००-१२२८००) (एस-१५, ४१८००-१३२३००) | २ | |
| २ | १)महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालमत्ता व्यवस्थापनेबाबत सविस्तर तपशील तयार करणे.<br>२)म.जी.प्रा.च्या नांवावर नसलेल्या मालमत्ता नांवावर करुन घेण्यासाठी उपाययोजना करणे.<br>३)मालमत्ता व्यवस्थापन विनियम तयार करणे.<br>४)प्रत्यक्ष मालमत्तेस भेट देऊन त्याबाबतचा अहवाल देणे.<br>५)मालमत्ताबाबत थकीत रक्कम वसूली करण्यासाठी उपाययोजना करणे. | उप अभियंता(स्थापत्य) (एस-२०, ५६१००-१७७५००) | १ | १२ महिने |
| | | कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) (एस-१४, ३८६००-१२२८००) (एस-१५, ४१८००-१३२३००) | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ६)मालमत्ता विषयक इतर कामकाज | | | |

उपरोक्त कामे करण्याकरीता, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करावयाची असून सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्त सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांना मासिक पारिश्रमिक व भत्ते देय राहतील. याकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या व उपरोक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छूक कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांचेकडून विहित नमुन्यात विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

२. सदर अर्ज २८ फेब्रूवारी, २०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर नवी मुंबई -४००६१४ या पत्त्यावर पाठवावेत. यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३. अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२. अर्जदार सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील असावेत.

३. वर नमुद केल्या कामाचा किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. कामाचे ठिकाण मुंबई येथील असल्यामुळे उमेदवार मुंबई/ठाणे/पालघर/रायगड जिल्हयातील राहणारा असावा.

७. आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवानिवृत्त कार्यकारी अभियता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८. इच्छूक उमेदवारांनी अर्ज वर नमुद केलेल्या कालावधीच सादर करावेत.

९. प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांनी अर्ज सादर केल्यास, अशा अर्जांचा विचार करता येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही अथवा त्या अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपुर्ण अधिकार प्राधिकरणास राहतील.

११. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांना अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई व मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., बेलापूर नवी मुंबई यांचे नियंत्रणाखाली काम करावे लागेल. व त्यांचेकडे कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करावा लागेल.

१२. इतर अटी व शर्ती हया सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे लागू राहतील.

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त कायकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांना विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| अर्जदाराचा अलिकडील काळाचे छायाचित्र |
|---|

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपुर्ण नांव | :- |
| २. | अर्जदाराचा पत्ता | :- |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक | :- |
| ४. | जन्मदिनांक व वय | :- |
| ५. | सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक व कार्यालय (सोबत आदेशाची प्रत जोडावी.) | :- |
| ६. | सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम | :- |
| ७. | प्राधिकरणास आवश्यक असलेली अर्हता आहे किंवा कसे | :- |
| ८. | मुळ निवृत्ती वेतन (निवृत्तीवेतन मिळत असलेल्या आदेशाची प्रत जोडावी.) | :- |
| ९. | शैक्षणिक अर्हता | :- |
| १०. | अनुभव | :- |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सविस्तर जाहिरातीमध्ये नमुद केलेली कामे व संबंधित नियंत्रण अधिकारी यांची सुचविलेली कामे इत्यादी कामे करण्याकरीता तसेच सदरील कामे करण्याकरीता कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) यांची करार पध्दतीने १ वर्षासाठी करावयाच्या नियुक्तीची जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी व नांव)